बुलढाणा/परभणी/अकोला/वाशिम/संभाजीनगर/जालना/बीड/नाशिक/पुणे/ठाणे/मुंबई/यवतमाळ/अमरावती.

RNI - MAHMAR/२०२२/८७८८४

गुरुवार दि.१० सप्टेंबर २०२६

दैनिक
# सेवाशक्ती टाईम्स
आपल्या हक्काचे दैनिक

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जालु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

●वर्ष- ४ थे ●अंक ७५ ●पाने-४ ● किंमत -२ रुपये

## बंजारा समाजाच्या मागण्यांसाठी आमरण उपोषण;प्रशासनाला १२ सप्टेंबरपर्यंतची मुदत

### विनोद आडे यांच्या उपोषणाची दखल घेण्याची मागणी; शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याचे निवेदन

दै.सेवाशक्ती टाईम्स.
भागवत चव्हाण

**जिंतूर** : बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी विनोद आडे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाची तातडीने दखल घेऊन शासनस्तरावर ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी सकल बंजारा समाजाच्या वतीने तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. आडे यांच्या उपोषणाचा पाचवा दिवस असून प्रकृती खालावत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या वैद्यकीय तपासणी व उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. बंजारा समाजाला आदिवासी समाजाप्रमाणे लागू असलेल्या सवलती व हक्कांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या समितीचा



अहवाल व कामकाजाची माहिती सार्वजनिक करावी, तसेच समाजाच्या मागण्यांसाठी बलिदान देणाऱ्या कुटुंबांना आर्थिक मदत व आवश्यक शासकीय सुविधा द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.इङ्ङयाशिवाय प्रलंबित आरक्षण, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रासंबंधीच्या अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था करावी. बंजारा समाजाच्या ऐतिहासिक व सामाजिक नोंदींचा अभ्यास करून हैदराबाद गॅझेटसह संबंधित ऐतिहासिक दस्तऐवजांच्या आधारे शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी निवेदनात आहे.

### १२ सप्टेंबरपर्यंत निर्णयाची मागणी

बंजारा समाजाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तातडीने शिष्टमंडळाची बैठक घेऊन ठोस निर्णय घ्यावा. १२ सप्टेंबरपर्यंत सकारात्मक कार्यवाही न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. दरम्यान, उपोषणकर्ते विनोद आडे यांच्या प्रकृतीची तातडीने वैद्यकीय तपासणी करून आवश्यक उपचार करावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, वसतिगृह, शिष्यवृत्ती व रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी विशेष उपाययोजना तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी घरकुल, जमीन, रोजगार व स्वयंरोजगाराच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना एकरी २५ हजार मदत द्या-आ.खरात

### पावसाअभावी झालेल्या पिक नुकसानीची आ. खरातांची बांधावर जाऊन पाहणी

दै.सेवाशक्ती टाईम्स.
नवल राठोड

**देऊळगाव साकरशा** :गेल्या दीड महिन्यापासून पाऊस नसल्याने पिके वाळली असून शेतकरी पूर्णता नेस्तनाबाबत झाला आहे. आज ९ सप्टेंबर रोजी आमदार सिद्धार्थ खरात यांनी तालुक्यातील देऊळगाव साखरशा सह काही भागातील पिक नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शासनाने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून, शेतकऱ्यांचा अंत न पाहता एकरी २५ हजार रुपये सरसकट मदत द्यावी अशी मागणी केली . खचून जाऊ नका, आम्ही सोबत आहोत असा धीर देखील त्यांनी यावेळी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिला. गेल्या दीड महिन्यापासून पाऊस गायब झाल्याने सोयाबीन, कपाशी मका, तूर, उडीद, मूग सह सर्वच पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोयाबीन, उडीद, कपाशी तर अक्षरशा वाळून गेली आहेत. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावल्याने शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. मेहकर तालुक्यातील



देऊळगाव साकरशा, पारखेड, मांडवा, वडाळी, नायगाव दत्तापूर सह काही भागातील पीक नुकसानीची आमदार सिद्धार्थ खरात यांनी बांधावर जाऊन पाहणी केली. सरकारने आता शेतकऱ्याचा अंत न पाहता दुष्काळ जाहीर करून सरसकट एकरी २५ हजार रुपयाची मदत तात्काळ द्यावी तसेच शेतकऱ्यांना पिक विमा सह ईतर सवलती द्याव्यात अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांसाठी प्रसंगी रस्त्यावर उतरण्याचा इशारा देखील यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिला. यावेळी तहसीलदार निलेश मडके, तालुका कृषी अधिकारी किशोर काळे, नायब तहसीलदार नितीन बोरकर, ज्येष्ठ पत्रकार बाळू वानखडे, माजी उपसरपंच रणजीत देशमुख, शाम निकम, मंडळ अधिकारी सचिन कापसे, मंडळ अधिकारी गणेश महाजन, कृषी सहाय्यक शिरसाट, तलाठी बालाजी माने, गजानन राठोड, रामचंद्र चव्हाण, शाखा प्रमुख दिगंबर अल्हाट,रतन सावजी, शे.चांद कुरेशी, शे.गुलाब, नरेंद्र पवार, नरेश साठे, वासुदेव सरदार, पिक पाहणी सहाय्यक किशोर चव्हाण, मांगु महाराज, सुभाष पवार, माजी उपसरपंच मांगीलाल राठोड, पंडीत देशमुख, पिंटु पाटील, रणजीत चव्हाण सह शेतकरी तसेच संबंधित खात्याचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## शेतकरी-कामगारांच्या प्रश्नांसाठी प्रशांत डिक्कर यांची संघर्षाची भूमिका कौतुकास्पद

दै.सेवाशक्ती टाईम्स.
गजानन सरकटे

**बुलढाणा** : महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर हे राज्यातील शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्षाची भूमिका घेत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन स्वराज्य पक्ष दक्षिण बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपालकृष्ण पाटील यांनी केले. प्रशांत दिक्कर यांनी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन शेतकरी परिषदा घेतल्या असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी मोर्चे, आंदोलने व उपोषणाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांच्या कार्याची विशेष बाब असल्याचे पाटील यांनी सांगितले. प्रशांत दादा डिक्कर यांच्या मार्गदर्शनातून



**शेतकऱ्यांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे-गोपालकृष्ण पाटील**

आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना शेतकरी प्रश्नांसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा व दिशा मिळाली. शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने लढत राहण्याचे मार्गदर्शन आम्हाला त्यांच्याकडून मिळत आहे. महाराष्ट्रातील शेतकरी सुखी व समृद्ध व्हावा, यासाठी त्यांचे कार्य असेच सुरू राहावे, अशी भावना गोपालकृष्ण पाटील यांनी व्यक्त केली.

# तीजमधून बंजारा संस्कृतीचे जतन; जिंतूरमध्ये दहा दिवस उत्साहाची उधळण

## महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; सांस्कृतिक कार्यक्रमांसह दररोज अन्नदान, पारंपरिक पद्धतीने तीज विसर्जन





निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेला आणि पर्यावरणप्रेमी असलेल्या बंजारा समाजाकडून तीज महोत्सवाच्या माध्यमातून वृक्षवल्ली व निसर्गाची पूजा केली जाते. या परंपरेतून समाजाची प्राचीन संस्कृती व अस्मिता जपली जाते. तीज महोत्सवामुळे महिलांना आपली कला व कौशल्य सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळते. तसेच नव्या पिढीला आणि इतर समाजघटकांना बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेची ओळख होते, असे सौ. सविता विनोद राठोड यांनी सांगितले.

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
भागवत चव्हाण


**जिंतूर** : समस्त गोर बंजारा समाजाच्या वतीने जिंतूर शहरात आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय तीज महोत्सवाची मंगळवारी (ता. ८) उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. पारंपरिक बंजारा संस्कृती, कला आणि परंपरेचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवात विविध सांस्कृतिक, धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल राहिली. महिला तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. जिंतूर शहरात चार वर्षांपूर्वी ॲड. विनोद राठोड नाईक यांच्या संकल्पनेतून तीज महोत्सवाला सुरुवात झाली. यंदाच्या महोत्सवाची सुरुवात ३० ऑगस्ट रोजी अविवाहित मुलींच्या हस्ते तीज पेरणीने झाली. त्यानंतर दहा दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. चव्हाण कलेक्शन व स्वरूप साडी सेंटरचे रमेश चव्हाण यांच्या वतीने 'होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा' हा कार्यक्रम घेण्यात आला. सुधाकर जाधव यांच्या पुढाकारातून प्रसिद्ध कलाकार गीतांजलीबाई यांचा कार्यक्रम झाला. पोखरणी तांड्यातील हास्यकलाकार सुनील जाधव यांनीही आपल्या विनोदी सादरीकरणातून उपस्थितांचे मनोरंजन केले. महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले. डॉ. अतुल जाधव यांच्या पुढाकारातून लिंबाळा तांड्यातील महिला पथकांचा ढंभोळी कार्यक्रम तसेच तीज पूजन पार पडले. दररोज सायंकाळी सात ते दहा या वेळेत झालेल्या संगीत रजनीने महोत्सवाची रंगत वाढविली. अखेरच्या दिवशी मुलींच्या हस्ते तीज तोडणी करून विधिवत तीज विसर्जन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शंकर जाधव, श्याम पवार, पांडुरंग आढे, विकास जाधव, टी. के. चव्हाण, भागवत चव्हाण, पंकज चव्हाण, सचिन आढे, नितीन चव्हाण, प्रवीण चव्हाण, सचिन राठोड, बंटी राठोड, आकाश राठोड, अविनाश चव्हाण, सुजित चव्हाण, शैलेश राठोड, रोहन चव्हाण, रितेश चव्हाण, रोहन जाधव, नकुल जाधव, संदीप राठोड, मनोज चव्हाण, अतुल आढे, नितीन आढे, आशिष राठोड, रवी राठोड, विजय राठोड व अजय पवार आदींनी सहभाग नोंदविला. महिलांचा महोत्सवातील सहभाग वाढावा तसेच त्यांना घरच्या स्वयंपाकाची गैरसोय होऊ नये, यासाठी दहा दिवस दररोज अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अन्नदानासाठी रामराव चव्हाण, मुकुंद चव्हाण, नामदेव चव्हाण, विलास चव्हाण, रोहित चव्हाण, रमेश वैजनाथ चव्हाण, नामदेव जाधव, ॲड. विनोद राठोड नाईक, सुधाकर जाधव, उमेश चव्हाण, डी. यू. राठोड, डॉ. ज्ञानेश्वर राठोड, रमेश गोविंदराव चव्हाण, रंगनाथ राठोड, प्रशांत राठोड, राजेश चव्हाण सर, सचिन राठोड, संतोष काळू चव्हाण, राहुल पवार, संतोष चव्हाण, डॉ. अतुल जाधव, नकुल जाधव, प्रकाश सवाईराम चव्हाण, स्वप्निल राठोड व नितीन जाधव यांनी योगदान दिले.

# वृद्ध महिलेची ७० हजारांची सोनसाखळी हिसकावणारा आरोपी जेरबंद, बोईसर पोलिसांची कारवाई

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
रवि भोईर

**पालघर** : वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे ७० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन जबरीने हिसकावून पळून गेलेल्या आरोपीला अटक करण्यात पालघर पोलिसांना यश आले आहे. बोईसर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेऊन ही कारवाई केली.ङ्गदिनांक १८ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.२० वाजता फिर्यादी रोहिणी रोहिदास ठाकूर (वय ५०, रा. पेठ पाटीलपाडा, ता. डहाणू) या त्यांच्या बहिणीसोबत बोईसर-चिल्हा फाटा रोडवरील सुशिला हॉटेलसमोर, हिडन क्लब कमानीजवळ रिक्षाची वाट पाहत उभ्या होत्या. त्यावेळी बोईसरच्या दिशेने आलेल्या लाल-काळ्या रंगाच्या स्कुटीवरील अनोळखी इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरीने हिसकावून पळ काढला. या प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७६/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०४(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष पथक तयार केले. घटनास्थळाची पाहणी करून तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास करण्यात आला. या तपासातून आरोपीची



ओळख पटली. राहुल सुरेश जखवाडिया (वय २७, रा. सेक्टर नं. ०२, १२३४ गार्डन, नवी मुंबई) याला दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.ङ्गपोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेली सोन्याची चैन तसेच गुन्ह्यात वापरलेली स्कुटी जप्त केली असून, गुन्ह्यातील १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कमलाकर मुंढे, बोईसर पोलीस ठाणे करीत आहेत.ङ्गही कारवाई पालघरचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे आणि बोईसर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बोईसर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील जाधव यांच्यासह अधिकारी व कर्मचारी तसेच सायबर पोलीस पथकाने तपासात महत्त्वाची भूमिका बजावली.

दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर ता.मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो.9011509831,RNI/MAHMAR/2022/87884

Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831,RNI/MAHMAR/2022/87884

दैनिक सेवाशक्ती टाईम्स


# रक्षाबंधन, दहीहंडी, स्वयंशासन आणि डॉ. म्हस्के लिखित पुस्तकं विमोचन

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
कृष्णा हावरे

**बुलढाणा** : ८ व ९सप्टेंबर २०२६ वार मंगळवार व बुधवार रोजी श्री सरस्वती कन्या विद्यालय जानेफळ श्री सरस्वती प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला तसेच भाऊ बहिणीच्या पवित्र बंधनाचे प्रतीक असलेले रक्षाबंधनसाजरे करण्यात आले. दोन्ही उपक्रम मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक नागेश घायाळ, सौ मीनल जोहरे व सर्व शिक्षक बंधू परिश्रम घेतले. त्यानंतर दि. ०९ सप्टेंबर रोजी श्री सरस्वती वि. तथा क. महाविद्यालयाच्या वतीने स्वयंशासन कार्यक्रम व ''अज्ञात स्वातंत्र्य विरांच्या कथा ''ह्या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी म्हस्के, प्रमुख अतिथी म्हणून हास्यकवी डॉ. कृष्णा हावरे, पर्यवेक्षक विष्णू गाडेकर उपस्थित होते. तर सत्कारमूर्ती म्हणून स्वयंशासन कार्यक्रमातीला प्राचार्या कु.किरण सान्वी किरण गोतरकर उपप्राचार्या कु तरल कृष्णा हावरे पर्यवेक्षिका म्हणून कु अदिती अशोक जाधव, कु आराध्या काकडे तर क्रीडा शिक्षक म्हणून गौरव फोलाने यांचा सत्कार करण्यात आला.ङ्कत्यानंतर स्वयंशासन कार्यक्रमात शिक्षकांची भूमीका करणाऱ्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.ङ्कत्यानंतर साहित्यिक डॉ. कृष्णा हावरे पर्यवेक्षक विष्णू गाडेकर यांच्या हस्ते डॉ म्हस्के लिखित '' सातारा जिल्ह्यातील दुर्लक्षित स्वतंत्र वीरांचा इतिहास' या पुस्तकांचे निमोचन करण्यात आले. त्यानंतर कु सान्वी गोतरकर हिने आपले मनोगत व्यक्त केले. ह्या मनोगतानंतर प्रमुख अतिथी डॉ. कृष्णा हावरे यांनी हलके -फुलके विनोद सांगत साहित्यिकाचे, लेखकाचे महत्व विशद केले. डॉ. शिवाजीराव म्हस्के यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे मत त्यांनी नोंदवले. पर्यवेक्षक विष्णू गाडेकर यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थी यांचे भरभरून कौतुक केले. त्यानंतर पुस्तकाचे लेखक व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी आपली भूमिका मांडली.ङ्क या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. रमेश नालेगावकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.





# जिगाव प्रकल्पाचे शेतीला पाणी मिळाले असते तर आज पिके सुकली नसती!

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
देवचंद्र समदूर

**शेगाव** : मातृ तीर्थ बुलढाणा जिल्हा हा ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा आहे परंतु या जिल्ह्यामध्ये औद्योगिक क्षेत्र व सिंचन व्यवस्था मुबलक प्रमाणात नसल्यामुळे हा जिल्हा मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो.ङ्क या जिल्ह्याचा मागासलेपणाचा डाग निघून जाण्याचे स्वप्न जिगाव प्रकल्पाने दाखवून दिले होते मात्र हा प्रकल्प भ्रष्टाचाराच्या जाळ्यात एवढा गुंतलेला आहे की ठरवून दिलेल्या कालावधीत हा प्रकल्प पूर्णच झाला नाही. त्यामुळे या प्रकल्पाला आणखी किती वर्ष पूर्ण होण्यास लागतील हे एक प्रश्नचिन्हच आहे.ङ्क गेल्या एक दीड महिन्यापासून पावसाने मारलेल्या दडीमुळे शेतकऱ्यांची सोयाबीन कपाशी तूर ही पिके सुखत चाललेली आहे काही भागात तर ही पिके जळून गेली तर काही भागात दोन-चार दिवसात पाणी आले नाही तर ती पण पिके जळून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही सर्वच वस्तूंची महागाई वाढल्याने आणि शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी यावर्षी खूपच मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. आतापर्यंत शेतकऱ्याने कर्जमाफीचे पैसे केव्हा खात्यात जमा होतील याकडे लक्ष केंद्रित करून थकला आणि त्यातच आता पावसाच्या पाण्याची चातका प्रमाणे वाट पाहत कासावीस झालेला आहे.




वर्षभराची पोटाची भाकर निसर्गाने हिरावून घेतल्यास शासनाकडून मिळणारी तूटपूंजी मदत ही शेतकऱ्याला तारू शकत नसल्याने शासनाने आता बुलढाणा जिल्हा वासियांसाठी नवसंजीवनी जीवदान देणारा जिगाव प्रकल्प हा त्वरित पूर्ण करून शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी पोहोचवावे आणि शेतकऱ्यांना जीवदान द्यावे अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून मिळत आहे. जिगाव प्रकल्पामुळे बुलढाणा जिल्ह्यातील तालुक्यामध्ये होत असलेली हरितक्रांतीचे स्वप्न पाहत असलेले अनेक शेतकरी हे आज काळाच्या पडद्याआड गेलेले आहेत काहींनी तर हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती सुद्धा दिली. या प्रकल्पाची काल मर्यादा किती होती आणि किती झाली हे सांगणे कठीण आहे. मागासलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी हरित क्रांतीचे स्वप्न बघत आहेत मात्र तुझ्यासोबत जगण्याचे स्वप्न माझे स्वप्नच राहिले ग! याप्रमाणे अनेक शेतकऱ्यांनी स्वप्न पाहिली मात्र ती स्वप्न अधुरीच राहिलेली आहेत आणि ते आपल्या मधून निघून गेले आणि आणखी किती पिढ्या जातील हे सांगणे कठीणच! बुलढाणा जिल्ह्याला लागलेला मागासलेपणाचा डाग आणि सध्या स्थितीत पाण्याअभावी शेतकऱ्यांचे होत असलेले पिकांचे नुकसान वाचवण्यासाठी जिगाव प्रकल्प त्वरित पूर्ण करून येथील शेतकऱ्यांना मरणाच्या दारातून वाचवावे. आणि जिल्हा हा सुजल सुफलाम बनवावा. अशा के विलवाण्या प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून पाहावयास मिळत आहेत करिता शासनाने जिगाव प्रकल्पामधील भ्रष्टाचार थांबवून प्रकल्प त्वरित पूर्ण करावा अशी मागणी आता जोर धरायला लागलेली आहे.

## माजी आ. संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून...

# पेनटाकळी कालवा बाधित शेतकऱ्यांसाठी ८६ लाख ४८ हजार रुपये मंजूर

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
अंकोश राठोड

**मेहकर** : पेनटाकळी प्रकल्पाच्या कालव्यातून पाझर सुरू झाल्याने शेत जमिनीचे मोठे नुकसान झाले होते. त्यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व तत्कालीन आमदार संजय रायमुलकर यांनी सतत वीस वर्ष संघर्ष करून महायुती शासनाकडून शेतकऱ्यांना पाच कोटी चाळीस लाख रुपये मिळवून दिले.



आता त्यांच्याच प्रयत्नातून नुकसान अहवाल यादीतून सुटलेल्या बाधित शेतकऱ्यांसाठी ८६ लाख ४८ हजार रुपये मंजूर झाले आहेत. ११ किलोमीटर कालव्याच्या तांत्रिक चुकीमुळे दुधा, ब्रह्मपुरी, रायपूर, पाचला आदी गावांच्या शेतकऱ्यांच्या शेतीचे पाणी पाझरामुळे मोठे नुकसान झाले होते. २००३ सालापासून याबाबत अनेक आंदोलनेही झाली. बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, यासाठी प्रतापराव जाधव व संजय रायमुलकर यांनी वीस वर्ष संघर्ष केला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर सतत पाठपुरावा करून रायमुलकर यांनी पाच कोटी चाळीस लाख रुपये शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाई मंजूर करून घेतली. त्याचे वितरण १६ जुलै २०२४ रोजी दुधा ब्रह्मपुरी येथे आयोजित कार्यक्रमात प्रतापराव जाधव व संजय रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले होते. परंतु खात्याच्या अभियंत्यांनी तयार केलेल्या नुकसान अहवाल यादीत अनेक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा समावेश नव्हता. २९ जुलै २०२४ रोजी आमदार संजय रायमुलकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र देऊन यादीतून सुटलेल्या शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्याची विनंती केली होती. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने जलसंपदा मंत्रांनी याबाबत कार्यवाही करून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या बैठकीत विषय क्रमांक १७ नुसार मागणीनुसार ८६ लाख ४८ हजार दोनशे पस्तीस रुपये नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. आता कार्यकारी अभियंता खडकपूर्णा प्रकल्प विभाग श्रीमती स.भु. डवरे यांनी उपविभागीय अभियंता जिगाव प्रकल्प पुनर्वसन उपविभाग तीन मुक्काम मेहकर यांना पत्र देऊन सदर रकमेचे वितरण करण्यासाठी संबंधित बाधित शेतकऱ्यांकडून त्यांचे बँक पासबुक, आधार कार्ड, सातबारा आदी दस्तऐवज गोळा करून व त्याची तपासणी करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा करण्यासाठी अहवाल विभागास सादर करावा , असे आदेश दिले आहेत. त्यामुळे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि संजय रायमुलकर यांनी दीर्घकाळ केलेल्या शेतकऱ्यांसाठीच्या लढ्याला यश आले आहे.

# देऊळगाव माळीत राऊत कुटुंबाकडून इको-फ्रेंडली गणेशमूर्तींची परंपरा

## साच्याशिवाय काळ्या मातीत साकारतेय कला

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
गजानन सरकटे

**देऊळगाव माळी** : हल्ली सण-उत्सव साजरे करताना आपण निसर्गाला आणि पर्यावरणाला कुठल्या धोकादायक टप्प्यावर आणून सोडले आहे, याचा सर्वांनीच अत्यंत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. चहूकडे प्लास्टर ऑफ पॅरिसचा (पीओपी) बेसुमार शिरकाव, थर्मोकोलचा झगमगाट आणि रासायनिक रंगांचा अतिवापर यामुळे आपल्या नद्या, तलाव आणि विहिरींचा श्वास पार गुदमरून गेला आहे. अशा या प्रदूषणकारी आणि कृत्रिम गर्दीतही निसर्गाचा समतोल राखत मातीशी असलेले आपले पवित्र नाते जपण्याचे धाडस मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी येथील एका निष्ठावंत मूर्तिकार कुटुंबाने दाखवून दिले आहे. देऊळगाव माळी येथील ज्येष्ठ मूर्तिकार हरिभाऊ राऊत आणि त्यांच्या परिवारातील तिसरी पिढी आजही कोणतीही रासायनिक भेसळ न करता, तसेच साच्याचा (डाय) जराही आधार न घेता केवळ स्वतःच्या हातांच्या कौशल्याने आणि शुद्ध काळ्या मातीने अत्यंत रेखीव आणि जिवंत गणेशमूर्ती साकारत आहे. स्वर्गवासी राजाराम गणपत कुंभार यांच्यापासून सुरू झालेला हा पारंपरिक वारसा हरिभाऊ राऊत आणि त्यांचे सुपुत्र कैलास राऊत तितक्याच निष्ठेने व समर्पणाने पुढे चालवत आहेत. आज बाजारात शाडू किंवा नैसर्गिक मातीच्या मूर्तींऐवजी स्वस्त आणि आकर्षक दिसणाऱ्या पीओपीच्या मूर्तींचा पूर आला आहे. मात्र, ही कृत्रिमता पूर्णपणे नाकारून विसर्जनानंतर निसर्गाच्या कुशीत सहज विलीन होणाऱ्या मूर्ती घडवणे, ही केवळ एक कला नसून ते एक मोठे सामाजिक उत्तरदायित्व आहे, ही या कुटुंबाची भावना आहे. राऊत कुटुंबाच्या याच अतुलनीय समर्पणाची आणि पर्यावरणपूरक कार्याची दखल खुद्द राज्य शासनानेही घेतली आहे. तत्कालीन व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील मंत्रालयात हरिभाऊ राऊत यांना ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक व मानपत्र देऊन विशेष सन्मानित करण्यात आले होते. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा वा कुटुंबाचा नसून, त्यांनी जपलेल्या पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आणि परंपरेचा गौरव होता.ङ्कआजघडीला विघटन न होणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिससारख्या वस्तूंचा त्याग करणे आणि कृत्रिम जलकुंडात विसर्जन करण्याचा पायंडा पाडणे ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. निसर्गाचा हा समतोल अबाधित राखण्यासाठी देऊळगाव माळीचे हे राऊत कुटुंब घेत असलेले कष्ट हे केवळ एका सणापुरते सीमित नसून, येणाऱ्या भावी पिढ्यांसाठी एक दिशादर्शक वस्तुपाठ ठरत आहेत.





आज संपूर्ण जग हवामान बदल आणि वाढत्या प्रदूषणाच्या भयावह संकटाशी झुंजत आहे. अशा गंभीर परिस्थितीत आपण ज्या देवतेचा उत्सव साजरा करतो, त्या देवाची मूर्ती किंवा पूजासाहित्य निसर्गाला घातक ठरणार नाही याची दक्षता प्रत्येक नागरिकाने घ्यायला हवी. शाडू आणि काळ्या मातीच्या मूर्तींची स्थापना करणे हा केवळ एक पर्याय नसून निसर्गरक्षणाचा दृढ संकल्प आहे. मातीची मूर्ती घडवून निसर्गाचा समतोल राखणे हीच आमची खरी ईश्वरसेवा आहे.-
हरिभाऊ राजाराम राऊत
(ज्येष्ठ मूर्तिकार, दे. माळी)

# निमखेडमधून अनंता उबाळे बनणार पहिला डॉक्टर

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
समाधान देशमुख


**सिंदखेड राजा** : तालुक्यातील निमखेड येथील अनंता सतीश उबाळे या युवकाने परीक्षेत घवघवीत यश संपादन करत डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले आहे. गावातून डॉक्टर होण्याचा पहिला बहुमान मिळवल्याने शाळेच्या वतीने तसेच ग्रामस्थांकडून अनंता उबाळे व त्यांच्या परिवाराचा सत्कार करण्यात आला.ङ्कजिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊनही डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करता येते, हे निमखेडसारख्या छोट्याशा गावातील अनंता उबाळे याने प्रत्यक्षात उतरवून दाखविले आहे. अनंताचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत पाचवीपर्यंत झाले. त्यानंतर पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण तुकाराम कायंदे विद्यालय येथे झाले.ङ्कमनाशी बांधलेला ध्यास आणि आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्द व चिकाटी बाळगत अनंताने परीक्षेची तयारी केली. पहिल्या आणि दुसऱ्या प्रयत्नात अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र, त्याने खचून न जाता अधिक जोमाने अभ्यास केला. यंदा झालेल्या परीक्षेत ५३६ गुण मिळवत त्याने उल्लेखनीय यश संपादन केले.ङ्कया उज्ज्वल यशाच्या जोरावर अनंता उबाळे हा सिंधुदुर्ग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरला आहे. गावातून पहिला एमबीबीएस डॉक्टर होण्याचा बहुमान मिळविणाऱ्या अनंताच्या यशाबद्दल ग्रामस्थांनी त्याचा सत्कार करून अभिनंदन केले.ङ्कअनंता हा शाळेचा माजी विद्यार्थी असल्याने मुख्याध्यापक तस्लीम शेख, सहशिक्षक वानखेडे तसेच अंगणवाडी सेविकांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रभाकर गायकवाड, शेषराव उबाळे, गजानन उबाळे, कुलदीप गायकवाड, सतीश उबाळे, गणपत किंगरे, बालासाहेब उबाळे, एकनाथ कनखर, भगवान कणघर, नारायण उगले, नामदेव उबाळे, संजय किंगरे, कैलास उबाळे, सर्जेराव उबाळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# खासगांव गोपी परिसरात बिबट्याचा वावर

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
ज्ञानेश्वर गंगावणे

**खासगाव** : जाफ्राबाद तालुक्यातील खासगाव गोपी परिसरातील शेतशिवारात सध्या बिबट्याचा वावर असल्याची प्राथमिक माहिती समोर आल्याने अनेकांना बिबट्या आढळून आल्याने खासगांव गोपी गावातील नागरिक व परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भितीचे व सतर्कतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी बांधवांनी शेतात काम करतांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात जाणे टाळावे, शक्यतो समूहाने शेतात जावे तसेच लहान मुले व पाळीव जनावरांची काळजी घ्यावी, असे आवाहन ग्रामस्थांनमधुन सोशलमिडीयाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. सध्या शेत शिवारात शेतीचे कामे सुरू असून रात्रंदिवस शेतात शेतकऱ्यांना अंधाराच्या साम्राज्यामध्ये पिकांना पाणी देण्यासाठी वाटेल ते जिवाचे रान करावे लागत आहे.महावितरण शासनाच्या भोंगळ कारभारामुळे शेतीला रात्री विजपुरवठा देत असल्याने रात्री बेरात्री वीज पुरवठा करत असून



शेतकऱ्यांना रात्री शेतात पिकांना पाणी देण्यासाठी जावे लागत आहे.त्यातच आपल्या लहान मुलाबाळांनसह शेतकरी मोलमजुरी करणारे व्यक्ती मध्ये सध्या घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी व मोल मजुरी करणाऱ्या व्यक्तीमध्ये सध्या खासगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतात लहान मुलांना सह अनेक जण दिसून येत आहे मात्र बिबट्याने या परिसरात दहशत माजवली आहे. खासगाव येथील शेतकरी शेख. शरीफ शेख मुसा यांच्या शेतातील गोठ्यावरील वासराचा बिबट्याने हल्ला करून पर्दाफाश करून भक्ष्य केलाचे दिसून आले. तर यामध्ये एका रोहीचा ही पर्दाफाश केल्याचे समजते तर गोपी परीसरात हि अनेकांना बिबट्या दिसल्याचे समजते. वनविभागाने तात्काळ पिंजरा लावून या बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी परिसरातून होत आहे.

# दुष्काळातून बार्शीटाकळीला वगळल्याचा जीआरच नसल्याची कृषी अधिकाऱ्यांची माहिती

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
प्रदीप गावंडे

**बार्शीटाकळी** : पावसाचा तब्बल ४५ दिवसांचा खंड... शेतातील सोयाबीन करपले... खरीप पिकांची वाढ खुंटली... उत्पादनाची आशा मावळली... आणि अशातच बार्शीटाकळी तालुका दुष्काळी परिस्थितीतून वगळल्याच्या बातम्या सोशल मीडियावर धडकू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, या चर्चेला कोणताही अधिकृत आधार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे.बार्शीटाकळी तालुका दुष्काळी परिस्थितीतून वगळल्याबाबत शासनाचा कोणताही अधिकृत शासन निर्णय (जीआर) अथवा अधिसूचना प्राप्त झालेली नाही, अशी स्पष्ट माहिती बार्शीटाकळीचे तहसीलदार रवींद्र काशीकर आणि तालुका कृषी अधिकारी संध्याताई करवा यांनी दिली आहे.ङ्गत्यामुळे गेल्या दोन-तीन दिवसांपासून फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप तसेच काही वृत्तवाहिन्या आणि वर्तमानपत्रांमधून प्रसारित होत असलेल्या बार्शीटाकळी तालुका दुष्काळी यादीतून वगळल्याच्या माहितीकडे अधिकृत आदेश नसताना अंतिम सत्य म्हणून पाहू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.बार्शीटाकळी तालुक्यात गेल्या सुमारे ४५ दिवसांपासून पावसाचा मोठा खंड पडला आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर खरीप पिकांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. तालुक्यातील अनेक भागांमध्ये सोयाबीनचे पीक पूर्णपणे सुकून गेले असून, पिकांची वाढ खुंटली आहे. शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर केलेला खर्च वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.ङ्गएकीकडे निसर्गाची अवकृपा, दुसरीकडे वाढता उत्पादन खर्च आणि त्यात पावसाचा लांबलेला खंड यामुळे शेतकरी आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. त्यामुळे शासनाने बार्शीटाकळी तालुक्यातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. बार्शीटाकळी तालुक्यात दुष्काळी परिस्थितीचे सर्वेक्षण सुरू आहे. दुष्काळाची पहिली कळ आणि दुसरी कळ यासह संबंधित निकषांच्या आधारे परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे. पर्जन्यमान, पिकांची स्थिती आणि झालेल्या नुकसानीचा आढावा घेतल्यानंतर सर्वेक्षणाचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.ङ्गहा अहवाल शासनाकडे सादर झाल्यानंतर शासन स्तरावर पुढील निर्णय होणार आहे. त्यामुळे सर्वेक्षणाची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच तालुका दुष्काळी यादीतून वगळल्याचा निष्कर्ष काढणे योग्य नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे, बार्शीटाकळीचे तहसीलदार रवींद्र काशीकर आणि तालुका कृषी अधिकारी संध्याताई करवा यांनी स्पष्ट केले की,''बार्शीटाकळी तालुका दुष्काळी परिस्थितीतून वगळल्याबाबत आमच्याकडे शासनाचा कोणताही जीआर किंवा अधिकृत अधिसूचना प्राप्त झालेली नाही.''त्यामुळे शेतकऱ्यांनी सोशल मीडियावर फिरणाऱ्या अपुऱ्या किंवा अनधिकृत माहितीकडे दुर्लक्ष करून प्रशासनाकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. बार्शीटाकळी तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा, पिकांचे तातडीने पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, यासाठी तालुक्यातील शेतकरी तसेच विविध संघटनांकडून प्रशासनाला सातत्याने निवेदने दिली जात आहेत.ङ्गदररोज प्राप्त होणारी शेतकऱ्यांची निवेदने शासनाकडे पाठविण्यात येत आहेत, अशी माहितीही संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांची शासन स्तरावर निश्चितच दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.ङ्गङ्गबार्शीटाकळी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सध्या सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ''दुष्काळी मदत कधी मिळणार?'' हा आहे. पिके हातातून गेल्यानंतर शेतकऱ्यांना केवळ आश्वासन नव्हे, तर शासनाच्या प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील अफवा आणि अपुऱ्या माहितीतून निर्माण होणारा संभ्रम दूर करून शासनाने दुष्काळी सर्वेक्षणाची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, वस्तुनिष्ठ अहवाल तयार करावा आणि नुकसानग्रस्त बार्शीटाकळी तालुक्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.ङ्गसध्या तरी प्रशासनाच्या स्पष्ट माहितीनुसार बार्शीटाकळी तालुका दुष्काळी परिस्थितीतून वगळल्याचा कोणताही अधिकृत शासन निर्णय प्राप्त झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी हतबल न होता अफवांवर विश्वास न ठेवता, शासनाच्या अधिकृत निर्णयाची प्रतीक्षा करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## जंगलात गुराढोरांना चारा-पाणी नसल्याने पशुपालक चिंतेत



**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
भारत चव्हाण

**सारकिन्ही** : बार्शीटाकळी तालुक्यात तसेच सारकिन्ही परिसरात मागील पन्नास दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. जंगलात गुराढोरांना चारा-पाणी शिल्लक नसल्यामुळे पशुपालकांवर जनावरे कशी जगवायची वेळ आली आहे. अनेक ठिकाणी तलाव पाझर तलाव आटले असून, गुरे-ढोरे चाऱ्याअभावी अशक्त झाली आहेत.आणी शेतकऱ्यांनी घरात कुठार साठवून ठेवले होते तेही संपले आहे ङ्ग शेतात पेरलेली सोयाबीन, तूर आणि कपाशी ही मुख्य पिके पाण्याअभावी पूर्णपणे वाळून गेली आहेत. शेतकऱ्यांनी कर्ज काढून केलेली पेरणी वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. त्यातच शासनाने जाहीर केलेल्या कोरड्या दुष्काळाच्या यादीतून बार्शीटाकळी तालुका वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आणि चिंता व्यक्त होत आहे. प्रत्यक्षात दुष्काळी परिस्थिती असताना तालुका वगळल्याने शासकीय मदत, अनुदान आणि विमा भरपाईपासून शेतकरी वंचित राहणार आहे. शासनाने तात्काळ पाहणी करून बार्शीटाकळी तालुक्याचा समावेश दुष्काळग्रस्त यादीत करावा, चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पिक विमा तात्काळ द्यावा, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी व पशुपालकांमधून होत आहे.

## बार्शिटाकळी तालुका पूर्णपणे कोरडा दुष्काळ जाहीर करा
## शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी यांचे कडे निवेदन



**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
अनिस शेख

**महान** :.बार्शिटाकळी तालुक्यातील समस्त शेतकऱ्यांच्या वतीने आज ९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी यांचे कडे या निवेदनाद्वारे शासनाने आमच्या भागातील गंभीर दुष्काळी परिस्थितीकडे लक्ष वेधून घेऊ इच्छितो. चालू वर्षामध्ये आमच्या भागात अत्यंत कमी आणि अनिश्चित पाऊस झाला आहे. त्यामुळे विहिरी, कूपनलिका (बोअरवेल) आणि स्थानिक जलस्रोत पूर्णपणे कोरडे पडले आहेत. पाऊस नसल्यामुळे शेतातील पिके (जसे की सोयाबीन, कापूस, बाजरी, मूग इत्यादी) पूर्णपणे जळून खाक झाली आहेत. या भयानक दुष्काळामुळे आमच्यासमोर खालील गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत: आमच्या मायबाप शेतक-यांची जगणेचे व उत्पन्नाचे साधन नष्टः शेतातील मुख्य पिके जळाल्यामुळे वर्षभराचे उत्पन्नाचे साधन पूर्णपणे नष्ट झाले आहे. जनावरांना चाऱ्याचा प्रश्नः पाण्याचे दुर्भिक्ष आणि दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कर्जाचा डोंगरः शेतीसाठी बँक आणि सोसायट्यांकडून घेतलेले कर्ज कसे फेडायचे, हा मोठा प्रश्न आहे. गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. आमच्या मुख्य मागण्या खालीलप्रमाणे आहेतः आमच्या भागात त्वरित कोरडा दुष्काळ जाहीर करून सरसकट पिकांचे पंचनामे करण्यात यावेत व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी मदत १ लक्ष रुपये आर्थिक (नुकसान भरपाई) त्वरित मंजूर करण्यात यावी. शेतकऱ्यांचे या वर्षाचे शेतकरी कर्ज आणि पीक विम्या संदर्भात संबधित कंपनीला आदेशित करुन तात्काळ विमा मंजुर करण्यात यावा व मंजुर रक्कम कंपन्यांकडून त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात यावेत. जनावरांसाठी छावण्या सुरू करून मोफत चाऱ्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. आम्ही शेतकरी अत्यंत हवालदिल झालो असून आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. तरी आपण या विषयाचे गांभीर्य ओळखून आम्हाला त्वरित न्याय मिळवून द्यावा, असेही निवेदनात शेतकऱ्यांनी स्वाक्षरीने म्हटले आहे.ही आपल्या सकारात्मक निर्णयाच्या प्रतीक्षेत सर्व शेतकरी बांधवाचे लक्ष लागून आहेत.निवेदन देता वेळी किशोर ठाकरे, संजय ठाकरे, नितीन इंगळे,निलेश चव्हाण,सचिन जाणुनकर,विशाल ठाकरे, भारत बहादरे,निलेश खरात,वसंतराव घुगे, बाळू आंधळे,सुनील म्हैसने,पवन कांबळे,मंगेश पांडे,दिलीप बाजरे,गोकुळ पोफळे,प्रतीक खरात,अमोल माहोरे सह अन्य शेतकरी बांधव उपस्थित होते.